

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)





Volume-IX, Issue-II
April - June - 2019
Marathi Part - II /
English Part - II

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by TapScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान<br>**डॉ. इंद्रजीत ओरके** | १-६ |
| २ | धर्मांतरण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. लुलेश्वर धरमसारे** | ७-९ |
| ३ | नामदेव ढसाळांच्या कवितेतील बाबासाहेब<br>**डॉ. जगदिश्वर मु. मेश्राम** | १०-१४ |
| ४ | डॉ. आम्बेडकर - एक समाज सुधारक<br>**श्रीमती प्रिया विवेक अनासाने** | १५-१८ |
| ५ | हिन्दु कोड बिल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव** | १९-२३ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यातील पुणे करार (१९३२)-एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. दिगांबर दत्तात्रय कापसे** | २४-२६ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या मानवतावादी दृष्टीकोण - एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. संजय उत्तमराव उगेमुगे** | २७-२९ |
| ८ | डॉ. आंबेडकर आणि आदर्श लोकशाही विषयक मार्गदर्शक तत्वे<br>**प्रा. विश्रांती एम. धडाडे** | ३०-३३ |
| ९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मीती कार्यातील योगदान<br>**डॉ. बबिता प्र. येवले** | ३४-३७ |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तत्वज्ञानविषयक दृष्टी<br>**डॉ. इंद्रजीत ओरके** | ३७-४२ |
| ११ | डॉ. अम्बेडकर के विचार - महिलाओं के सन्दर्भ में<br>**डॉ. सीमा पाण्डेय** | ४३-४५ |
| १२ | मानवी मूल्यांचा शिल्पकार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. निलिमा दिगांबर कापसे** | ४६-४८ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जलनिती<br>**प्रा. डॉ. राजु भा. खरडे** | ४९-५४ |
| १४ | डॉ. बाबासाहेबांनी केलेली बुध्दधम्म विचारांची पुर्नमांडणी<br>**प्रा. सुजाता केणे** | ५५-५७ |
| १५ | ग्रामिण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा स्वआदर - तुलनात्मक अभ्यास<br>**दिनेश जारोंडे** | ५८-६० |
| १६ | प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांमधील सामाजिक क्षमतेचा अभ्यास<br>**दिनेश जारोंडे** | ६१-६४ |




Scanned by TapScanner

ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ५. हिन्दु कोड बिल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव**
गृहविज्ञान विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर, गढी, ता. गेवराई, जि. बीड.

**सारांश**

हिंन्दु कोड बिल स्त्री गुलामीला लावलेला सुरुंग, अंधार संपविणारा प्रकाशझोत आहे. हिंदु कोड बील कोणत्याही धर्माच्या विरोधात नव्हते द्वोषापोटी नाही तर समस्त भारतीय स्त्रीयांच्या संरक्षणासाठी होते स्त्रीयांचा समग्र विकास आणि उत्थानाचा जाहिरनामा डॉ. आंबेडकरांनी हिन्दु कोड बिलातून सादर केला १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिला २६ दिवस बाबासाहेबांनी अवरित कष्ट करुन हिन्दु कोड बिल तयार केले आणि २४ फ्रेब्रुवारी १९४९ रोजी ते संसदेन मांडले. भारतीय स्त्रीयांना कायदयाने हक्क दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यांचे स्वप्न त्यांनी हिंदु कोड बिलाच्या माध्यमातूह पहिले हे बील ज्या सात वेगवेगळया घटकाशी निगडीत कायदयाचे कलमात रुपांतर करु पाहणार होते ते सात घ्टक म्हणजे १) जी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत पावली असेल अशा व्यक्तीच्या (स्त्री - पुरुष दोघांच्याही) मालमत्तेच्या हक्काबाबत २) मृताच्या वारस ठरवण्याचा अधिकार ३) पोटगीचा अधिकार ४) विवाह ५) घटस्फोटाचा अधिकार ६) दत्तक विधान ७) अज्ञानत्व व पालकत्व. परंतू कडवे हिंदू (ब्राम्हण) नेते आणि विचारवंत यांना स्त्रीयांना समान अधिकार देण्याची तयारी नव्हती त्यामुळे स्वत:ला उदारमतवादी आणि पुरोगामी म्हणून घेणाऱ्या राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद, वल्लभाई पटेल, मदन मोहन मालवीय, मावळंकर पडिंत मुकुटबिहारीलाल इ नेत्यांनी बिलाला प्रचंड विरोध केला. हिंन्दु कोड बिलाचे काही समर्थकही होते त्यात आचार्य कृपलानी श्रीमती सुचेता कृपलानी श्रीमती रेणुका रे श्रीमती कमला चोधरी, श्रीमती हंसा मेहता, आचार्य अत्रे इ. पंडीत नेहरुना हे बील मान्य होते -परंतू देशात सर्वत्र विरोध होत असल्यामुळे नेहरुंना बील स्थगित करावे लागले. बाबासाहेबांनी आपल्या अपत्याप्रमाणे या हिन्दु कोड बिलांवर प्रेम केले होते त्यांना हे सहन झाले नाही म्हणून त्यांनी २६ सप्टेंबर १९५१ ला आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला पण बाबासाहेबाचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत. हिन्दु कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करुन १९५५ - ५६ मध्ये नेहरुंनी मंजूर करुन घेतले त्यामध्ये १) हिन्दु विवाह कायदा २) हिंदु वारसा हक्क कायदा ३) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा ४) हिंदू दत्तक विधान व पोटगी कायदा या कायदयांनी भारतीय स्त्रीयांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली. तसेच स्त्री पुरुषांच्या दर्जात कायदयाने समानता प्रस्थापित झाली.

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रज्ञासुर्य भारतरत्न, महामानव भारतीय समाजाच्या व संबंध भारत देशाच्या सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक सामाजिक पुनर्रचनेचा पाया रचणारे क्रांतीकारक , जगाच्या ईतिहासावर ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा चिरंतन ठसा उमटविला, दीन - दलित - पीडीत, शोषित समाजाच्या शेवटच्या घटकातील माणसांचे कैवारी, प्रज्ञावंत पंडीत, कायदेतज्ञ अर्थतज्ञ, कृषी व जलतज्ञ विश्ववंदनीय असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील गरीब, दलित, पिडीत, महिला कामगार आणि सर्व वंचीत घटकांना न्याय हक्क आणि अधिकार मिळवून

देण्यासाठी जे महान कार्य केले. त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही हे अद्वितीय आणि क्रांतीकारक कार्य करणाऱ्या या महामानवाच्या देशात आपला जन्म झाला ही आपणासर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. बाबासाहेब हे लोकोत्तर नेते आणि प्रकांडपंडीत होते. या देशाने सर्वांगीण प्रगती करावी. विकास करावा आणि त्यंची फळे तळागाळातील सर्व घटकांना मिळावीत यासाठी ते अखेरच्या श्यवासापर्यंत झटले. या घटकांना आत्मसन्मान आणि आत्मभान त्यांनी मिळवून दिला. जाज्वल्या उदाहरण म्हणजे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी केलेल्य महान कार्यामुळे आज स्त्रीया आत्मविश्ववासाने सर्व क्षेत्रात आपल्य कर्तत्वाने तळपत आहेत. प्रस्तुत शोध निबंधा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयांना कायदयाने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी केलेल्या क्रांतीकारी कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) हिंदू कोड बिलाच्या पार्श्वभुमीचा अभ्यास करणे.

२) हिंदू कोड बिलाच्या निर्मितीसाठी बाबासाहेबांनी केलेल्या महान क्रांतीकारी कार्याचा आढावा घेणे.

३) हिंदू कोड बिलातील विविध तरतुदींचा अभ्यास करणे.

४) हिंदू कोड बिलाचे विरोधक व समर्थक यांची माहिती घेणे.

५) हिंदू कोड बिलाच्या बरखास्तीच्या कारणांचा आढावा घेणे.

**गृहितके**

१) बाबासाहेबांनी तयार केलेल्या हिंदू कोड बिलांमुळे भारतीय समाजातील स्त्रीयांच्या दर्जात अमुलाग्र परिवर्तन झाले आहे.

२) हिंदु कोड बिलांतील विविध कायदयामुळे भारतीय स्त्रीयांना स्त्री - पुरुष समानतेची व योग्य सन्मान मिळवण्याची सोनेरी संधी प्राप्त झाली आहे.

३) भारतीय स्त्रीयांच्या जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणण्यासाठी बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या निर्मितीसाठी केलेल्या महान कार्याची म्हणावी तशी दखल आपल्या माता भगिनींनी घेतलेली नाही.

**तथ्य संकलनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी विविध संदर्भ ग्रंथ मासिके, नियतकालिके, वर्तमान पत्रे, चारित्रग्रंथ, इंटरनेट इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण**

**हिंदू कोड बिल पार्श्वभूमी**

पेशवेकाळात स्त्रीयांना हीन दर्जा देण्यात आला होता बाल - जरठ विवाह, सती प्रथा, केशवपन इत्यादी अनिष्ठ प्रथा अस्तित्वात होत्या स्त्रीयांवर विविध प्रकारचे अन्याय अत्याचार केले जात असत जातीद्वेष पराकोटीला पोहचला होता. दीन - दलितांवर विविध प्रकारचे अन्याय केले जात असत त्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारुन अज्ञानात ठेवले होते. व त्यांचे माणुसपण हिरावून घेण्यात आले होते. याचकाळात क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले या महामानवाचा उदय झाला. ज्याने बहुजनाला



Scanned by TapScanner

स्त्री - शुद्राला शिक्षणाची द्वारे खुली केली यासाठी फुले दांपत्याला तत्कालीन कर्मठ लोकांचा अतोनात छळ सहन करावा लागला परंतू त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून व विविध प्रबोधनपर कार्यक्रमाद्वारे तत्कालीन समाजातील अनिष्ठ रुढी परंपरा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. राजाराम मोहन रॉय यांनी सतीची चाल बंद केली तसेच ४ डिसेंबर १८२९ साली लॉर्ड विल्यम बेंटींक यांनी सती बंदीचा कायदा केला परंतू भारतात कायदे करुनही अंमजलबजावणी होत नाही. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक क्रांतीद्वारे समाजातील अनिष्ठ रुढी परंपरा दुर करण्यासाठी व स्त्रीयांना समाजात सन्मानाने वागणूक देण्यासाठी जीवनभर प्रयत्न केले. त्यांच्यानंतरही ही वाईट रुढी परंपरा काही अंशी चालू होत्या व स्त्रीयांवर होणारे अन्याय अत्याचार पुर्णपणे बंद झालेले नव्हते. समाजातील स्त्रीयांच्या बाबतीतील वाईट रुढी परंपरांना आळा घालण्यासाठीच व स्त्रीयांच्या मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिल तयार केले.

**हिंदु कोड बिलाची निर्मिती**

स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून बाबासाहेबांची इच्छा होती की तमाम स्त्रियांना या जाचक रुढी आणि परंपरा मधून मुक्त करावे आणि ते आपले कर्तव्य आहे असे समजून त्यांनी हिंदू कोड बिल. बिल बनवायला घेतले १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस बाबासाहेबांनी अविरत कष्ट करुन हिंदू कोड बिल तयार केले. हे कोड बिल भागात १३९ कलमात आणि ७ परिशिष्टात विभागले होते. पुरुषसत्तक व्यवस्थेत स्त्रीयांनी गुलामी स्वाकारावी, अन्याय सहन करावा हे त्यांना मान्य नव्हते. त्यासाठी त्यांनी आग्रहपूर्वक ११ एप्रिल १९४७ रोजी संविधात सभेत हिंदू कोड बिल मांडले आणि ते बील २७ सप्टेंबर १९५१ पर्यंत मान्य न झाल्याने त्यांनी कायदे मंत्री पदाचा राजीनामा दिला.

स्त्रीयांच्या उन्नतीसाठी हिंदू कोड बिल आणण्याची आवश्यकता होती. मात्र सरकारने या बिलाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. ११ एप्रिल १९४७ रोजी मांडलेले हिंदू कोड बिल व ९ एप्रिल १९४८ पर्यंत भिजत ठेवले. त्यानंतर हे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवून दिले. १९४९ साली चर्चेला घेण्यात आले फेब्रुवारी १९४९ मध्ये चार दिवस, मार्च १९४९ मध्ये एक दिवस एप्रिल १९४९ मध्ये.१९४९ मध्ये एक दिवस एप्रिल १९४९ माणसे दोन दिवस चर्चा झाली व निर्णयाविना चर्चा संपली १७ सप्टेंबर १९५१ रोजी हे बील पुन्हा चर्चेस आले असता, खुद्द पंतप्रधान नेहरु यांनी त्यान कपात सुचविली ही कपात इतकी भयंकर होती की, मुळ बिलाचे रुपच बदलून गेले त्यामुळेच बाबासाहेबांचा संताप अनावर झाला व त्यांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

या बिलाचे महत्व प्रतिपादन करताना डॉ. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, "पार्लमेन्ट पुढील हिंदू कोड बिल ही एक महत्वपूर्ण घटना होती वती या देशातील कोणत्याही अधिवेशनात विचारात घेतली नव्हती. एव्हढेच नव्हे तर पार्लमेन्ट मध्ये यापूर्वी व पुढेही येणाऱ्या कोणत्याही कायदयाची बरोबरी हिंदु कोड बिलाबरोबर करता येणार नाही इतके त्यांचे महत्व आहे. हिंदू समाजातील वर्गावर्गातील उच्च नीच भेद लिंगभेद तसेच कायम ठेवून केलेले कोणतेही निव्वळ आर्थिक परिस्थीत सुधारण्याचे कायदे म्हणजे घाण न काढता त्यावर उभारलेले पत्याचे बंगले होत ही तर घटनेची थट्टा आहे."

**हिंदू कोड बिलातील तरतुदी**

१) वैवाहिक हक्काची भरपाई म्हणून पतीच्या संपत्तीमध्ये पत्नीचा हक्क, मिळालेल्या स्त्री धनावर पत्नीचा हक्क, विधवा झाल्यावर संपत्तीचा वारसा हक्क.



Scanned by TapScanner

२) स्त्रीला पतीपासून घटस्फोट मागण्याचा हक्क, पारंपारिक दत्तक विधान पध्दती रद्द आणि कायदेशीर तरतुदीनुसार दत्तक घेण्याची पध्दत निश्चित

३) स्त्रीला दत्तक निवडण्याचा, घेण्याचा हक्क पारंपारिक दत्तक विधान पध्दती रद्द आणि कायदेशीर तरतुदीनुसार दत्तक घेण्याची पध्दत निश्चीत.

४) अल्पवयीन मुलाचे पालकत्व वडील हयात नसल्यास आईकडे जाण्याची तदतूद

५) दत्तकास संपत्तीचा अर्धा हिस्सा आणि आईस संपत्तीचा अर्धा हिस्सा मिळेल.

६) द्विभार्या प्रतिबंध म्हणजेच एकपत्नीत्वाची तरतूद.

७) वडीलांच्या संपत्तीत मुलीस हिस्सा.

८) ज्यांना पारंपारिक पध्दतीने विवाह करावयाचा आहे. त्यांना मोकळीक तसेच वर्ण, जात पोटजात या बाहेरिल व्यक्तीशी विवाह केला तर तो कायदेशीर विवाह म्हणून मान्यता देणारी तरतूद

९) स्त्रीला स्वतःचा वारस ठरविण्याचा अधिकार

या तरतुदीमुळे स्त्रीयांना संपत्तीमध्ये समान वाटा आणि सर्व कायदेशीर बार्बीमध्ये समान संधी , एकपत्नी विवाहास कायदेशीर मान्यता दत्तक विधान हक्क इत्यादीमुळे स्त्रीला गुलाम म्हणून दुय्यम दर्जाची वागणुक मिळणार नाही. उलट स्वातंत्र्य माणूस जगण्याचा हक्क मिळणार होता.

**हिंदू कोड बिलामधून कायदे**

१९५१ मध्ये हिंदू कोड बिल पास होवू शकले नाही परंतू कालांतराने हिंदू कोड बिलाचे महत्व लक्षात घेवून कोड बिलाचा काही भाग पुढे १९५५ - ५६ मध्ये चार वेगवेगळे भाग करुन चारही कायदे वेगवेगळया वेळी नेहरुंनी मंजूर करुन घेतले ते कायदे म्हणजे.

१) विशेष विवाह कायदा -१९५५ व हिंदू विवाह कायदा - १९५५

२) हिंदू वारसाहक्क कायदा -१९५६

३) हिंदू दत्तक ग्रहण व निर्वाह कायदा -० १९५६

४) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा - १९५५

अशाप्रकारे बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक गेले नाहीत हे कायदे मंजूर होणे म्लणजे कायदयाच्या इतिहासातील एक क्रांतीकारकी घटना होय या कायदयांनी भारतीय स्त्रीयांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडवण्यास सुरुवात झाली या कायदयांनी स्त्री - पुरुषांच्या दर्जात कायदयाने समानता प्रस्थापित केली.

**हिंदू कोड बिलाचे विरोधक**

बाबासाहेबांनी मांडलेल्या या हिंदू कोड बिलाला सर्वसामान्य माणसांपासून देशाच्या राष्ट्रपतीपर्यंत विरोध झाला. अनेकदा त्यांना मारण्यांच्या धमक्या येवू लागल्या. त्यांच्या अंगावर हिंदू कोड बिल विरोधी मोर्चेही धावून आले परंतू पोलिस संरक्षणामुळे ते बचावले या बिलाला धार्मिक संस्थाचा सनातन्याचा तर विरोध होताच पण काही जीर्णमतवादी विचारांचे पुढरी ही विरोध करत होते. यात प्रामुख्याने भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद, श्यामप्रसाद मुखर्जी पंडीत मदत मोहन मालवीय, स्वामी

करपात्री, श्रीमती शांतीदेवी, पंडीत ठाकूर, सरोजनी नायडू, दास भागवे, डॉ. टेवाचंद बक्शी, राम नारायण सिंह, डॉ. बि पट्टाभी सितारामया नजीरुद्दीन अहमद, सरदार, वल्लभभाई पटेल. पंडीत मुकुंद बिहारीलाल भर्गाव, एस. एन. सहाय्य अनेक मुसलमान खिस्ती, जैन, शीख यांनी विरोध केला. अनेक स्त्रीयांनी आपल्या पतीच्या धमक्यामुळे बाबासाहेबांविरुध्द मोर्चे काढले. पार्लमेंट मध्ये निवडून आलेल्या स्त्रीयांनी देखील या बिलाबाबत जागरुकता दाखविली नाही.

**हिंदू कोड बिलाचे समर्थक**

हिंदू कोड बिलाला जसे विरोधक हेते तसे काही समर्थकही होते. त्यात प्रामुख्याने आचार्य कृपलानी श्रीमती सूचेता कृपलानी, श्रीमती पद्मजा नायडू, श्रीमती रेणुका रे, श्रीमती कमला चोधरी कु राजश्री, डॉ. पां. वा. काणे, जनमदास मेहता, पु. म. लाड, श्रीमती मिटन लाम, आचार्य अत्रे, जी . जी. दळवी सौ. लालवती मुन्शी, डॉ. पंजाबराव देशमुख, दिवाण बहादूर जव्हेरी एच. व्ही. कामत. वि. स . खांडेकर के संतानाम, कृष्णाचंद्र शर्मा, सीताराम जाजू, अलनंदि कृष्ण स्वामी, श्रीमती जी दुर्गाबाई के टी. शहा. इत्यादी पुरोगामी विचारांच्या लोकांनी हिंदू कोड बिलाला समर्थन दिले. पंतप्रधान जवाहरलाल नेहरुही हिंदू कोड बिलाचे समर्थ होते परंतू तत्कालीन राष्ट्रपतीची राजीमान्याची धमकी व देशभरातील धार्मिक व जीर्णमतवादी लोकांच्या विरोधकांच्या रेटयामुळे त्यांना बिल बरखास्त करावे लागले.

**हिंदू कोड बिलाच्या बरखास्तीची कारणमिमांसा**

हिंदू कोड बिलाला विरोध करणाऱ्यंचे तीन वर्ग होते एक सनातनी दुसरा वर्ग राजकीय पुढाऱ्यांच्या आणि तिसरा वर्ग सवर्ण हिंदुतील वर्णश्रेष्ठत्वाने पछाडलेल्या लोकांचा. या लोकांच्या मते हिंदू कोड बिल पास झाले तर त्याचा परिणाम असा होईल कि ज्या हिंदू धर्मशास्त्राचे संहीतीकरण आतापर्यंत वर्णश्रेष्ठ हिंदूला करता आले नाही ते एका अस्पृश्य पंडिताने केले यात आपली नामुष्की होणार आहे. हे बिल जर पास झाले तर बहूजन समाज त्याला "आंबेडकर स्मृती" म्हणून संबोधिल आणि देशाच्या भावी इतिहासात हेच नमूद करण्यात येईल. म्हणून या बिलाला प्रचंड विरोध केला कडवे हिंदू नेते आणि विचारवंत यांना स्त्रीयांना समान अधिकार देण्याची तयारी नव्हती "हिंदू धर्मावरील आक्रमण" एक अस्पृश्य व्यक्ती हिंदू धर्मावर भाष्य करतोय म्हणून बऱ्याच तथाकर्थीत हिंदू समाजाने बाबासाहेबांविषयी घृणास्पद प्रतिक्रिया दिल्या "बाबासाहेब देशद्रोही" "हिंदू धर्माचा शत्रु" अशा घोषणा देत मोर्चे काढले स्वतःला उदार मतवादी आणि पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या राजेंद्र प्रसाद वल्लभभाई पटेल आणि मदत मोहन मालवीय यांनी त्यांचे खरे रुप दाखवून RSS शी हात मिळवून बाबासाहेबांना पराकोटीचा विरोध केला ज्या स्त्रीयांसाठी बाबासाहेब इतकी मेहनत घेत होते ते बील पारित होऊ नये म्हणून सरोजीनी नायडू उपोषण करणार होत्या स्त्रियांना बाबासाहेबांच्या विरोधात मार्चे काढण्यासाठी प्रेरीत केले जात होते. या सर्वांमध्ये प्रत्येकचे हेतू निरनिराळे होते तरी त्याचा परिणाम एकच झाला. तो म्हणजे पं. नेहरु मंत्रीमंडळ विरोधाला घाबरले आणि हिंदू कोडबिल बरखास्त करण्यात आले.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर स्त्रीयांच्या प्रश्नाचा विचार केला. स्त्री शिक्षण, नीतिमत्ता, स्त्रीयांचे आरोग्य, कुटुंब नियोजनातील स्त्रीयांची जबाबदारी, संपत्तीमध्ये स्त्रीयांना वारसा हक्क, स्त्रीयांची शारिरिक मानसिक लैंगिक छळातून मुक्तता, व्दिभार्या प्रतिबंध करुन स्त्री समानतेचा पुरस्कार इत्यादी साठी त्यांनी हिंदू कोड बिल निकडीचे वाटले यामुळे

समाजातील पुरष प्रधान स्वरुप व स्त्रीदास्य संपणार होते. लक्षावधी स्त्रीयीया आपल्य पतीच्या क्रुर व अमानवी दडपणापासून मुक्त होणार होत्या म्हणून बाबासाहेब म्हणतात. "मला भारतीय राज्यघटना निर्माण केली त्यापेक्षा हिंदू कोड बिल माझ्या हातून झाले याचा आनंद होतो." भारतीय स्त्रीयांच्या अस्मितेसाठी आणि जागृतीसाठी बाबासाहेबांनी जे अभुतपूर्व कार्य केले त्याला तोड नाही. स्त्रीयांना परंपरागत गुलामगिरीतून काढून तिला स्वातंत्र्य देण्याचे व तिचा उध्दार करण्याचे कार्य भगवान बुध्द महात्मा फुले व सावित्रीबाई पुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यार सारख्या महामानवानी केली आहे. येणारी पीढी प्राचीन भारतातील गुलाम स्त्री व आधुनिक भारतातील स्वतंत्र स्त्री यांचा तुलनात्मक अभ्यास करेल तेव्हा संपूर्ण देश फुले आंबेडकरांच्या स्त्री मुक्तीच्या कार्यापुढे झुकल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ सुची**

१) डॉ. डी एम तंगलवाड, डॉ. रवि एन. सरोदे (२०१४) युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवानी प्रकाशन, नांदेड

२) डॉ. प्रल्हाद लुलेकर (२०१५) - दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनंत पैलुंचा सामाजिक योध्दा, सायन पब्लिकेशन, पुणे.

३) एल. आर. बाली (२००८) डॉ. आंबेडकर कलम का कमाल संपूर्ण वाड्मय का सार - भाग २ भीम पत्रिका पब्लिकेशन, जालंधर.

४) लोकराज्य (एप्रिल २०१८) मुख्य संपादक ब्रीजेश सिंह, माहिती व जनसंपर्क महा संचलानालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

५) Prabodhnteem.blogspot.com



Scanned by TapScanner